माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील
गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या
प्रशासकीय कारणास्तव बदलीबाबत.

महाराष्ट्र शासन
माहिती व जनसंपर्क विभाग
शासन आदेश क्रमांकः मावज-२०२६/४४/प्र.क्र.१५/मावज-२(३४-अ)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक: २२ जुलै, २०२६

<u>वाचा</u> :- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. बदली-२०२३/प्र.क्र. ३२/कार्या-१२, दिनांक ३० मे, २०२३

शासन आदेश

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ च्या कलम ४ (४) व (५) नुसार माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ व गट-ब या संवर्गातील खाली नमूद केलेल्या अधिकारी यांची कामकाजाच्या व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	नाव/	पदनाम व सध्याचे कार्यालय	बदली नंतरचे पद व कार्यालय
१	२	३	४
१	श्री. प्रविण टाके	उपसंचालक (मा), विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर	उपसंचालक (मा) विभागीय माहिती कार्यालय,छत्रपती संभाजीनगर
२	श्री. सचिन अडसूळ	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधूदूर्ग
३	श्री. मुकुंद चिलवंत	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग	जिल्हा माहिती अधिकारी जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर
४	श्रीमती वर्षा पाटोळे	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, सातारा	जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर व अतिरिक्त कार्यभार उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

०२. वरील अधिकारी यांना बदलीच्या पदावर रुजू होण्यासाठी दिनांक ३१ जुलै, २०२६ (म.नं.) पासून त्यांच्या रकाना क्र.३ येथील पदावरुन तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावासमोर स्तंभ ४ मध्ये दर्शविलेल्या पदावर तात्काळ रुजू होऊन आवश्यक अहवाल संबंधित कार्यालयांस तसेच शासनास विनाविलंब सादर करावा. उपरोक्त अधिकाऱ्यांचे दिनांक ०१.०८.२०२६ पासूनचे वेतन बदली झालेल्या ठिकाणी अदा करण्यात यावे.

०३. तसेच उक्त बदलीच्या पार्श्वभूमीवर एखादे पद रिक्त राहत असल्यास प्रशासकीय अडचण होऊ नये याकरीता सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही २०१८/प्र.क्र.२०८/कार्या-१२ दिनांक ०५ सप्टेंबर, २०१८ मधील तरतूदीनुसार अतिरिक्त कार्यभार देण्याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

०४. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. बदली झालेल्या अधिकाऱ्याने बदलीनंतरच्या पदस्थापनेत बदल करण्यासंबंधी केलेल्या कोणत्याही विनंतीची दखल घेण्यात येणार नाही व त्या संदर्भात कोणत्याही प्रकारे दबाव आणल्यास संबंधित अधिकाऱ्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

०५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२२१२२१५५७०३८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR

Digitally signed by YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=F7CCDB18D954BB814D3CC3C92AB0C128E19F5F95C724ABAF0A38FA1A74DEC734, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1A45294B68B97E03C570AFA8F17C64F6DFE2A4A241DD2AFF2322FEEC22B389F5, cn=YUVRAJ MANOHAR SOREGAONKAR
Date: 2026.07.22 12:23:10 +05'30'

(युवराज सोरेगांवकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
२. प्रधान सचिव (मा.व ज.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई, नागपूर,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व परीक्षा), मुंबई, नागपूर,
५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
६. संचालक (माहिती) (प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
७. संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
८. संचालक (माहिती), नागपूर-अमरावती विभाग, नागपूर.
९. सर्व विभागीय उपसंचालक (माहिती),
१०. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
११. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती.
१२. संबंधित अधिकारी (मा.व ज. मार्फत),
१३. माहिती व जनसंपर्क विभाग / का.३४,
१४. निवड नस्ती (का.३४-अ)